## प्रस्तावना

**विषय - महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी मनपाचे हायड्रोलिक वाहन वापरबाबत मागणीकारास हमीपत्रासह भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे बाबतच्या ठरावास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडे धोकादायक झाडे छाटणी कामी मनपाचे हायड्रोलिक वाहन (स्काय लिफट) कार्यान्वित आहे. सदर वाहनाचा वापर मनपाच्या छत्रपती शिवाजी चौक मधील छत्रपती शिवाजी महाराजाचा आश्वारुढ पुतळा व मनपाच्या नविन प्रशासकीय कार्यालयाच्या आवारातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पाण्याने धुणे व साफसफाई करणेसाठी तसेच पुष्पहार अर्पण करणेकामी वापर केला जात असुन, आपत्कालिन कार्यवाहीसाठी सुध्दा वापर केला जात आहे. सद्यस्थितीत मनपाकडे कार्यरत एकच वाहन असल्यामुळे वरील कामी निरंतर कार्यरत असते.

तथापी भिवंडी शहरात राष्ट्रीय पक्षाकडून विविध होणारे कार्यक्रम सांस्कृतिक कार्यक्रम तसेच राष्ट्रीय पक्षांचे संघटनाचे नेते यांचे शहरात आगमन या निमीत्ताने सदर पक्षाचे, संघटनाचे कार्यकर्ते, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी विविध संघटना पक्ष कार्यकर्ते हायड्रोलिक वाहनाची तात्काळ मागणी करतात त्यामुळे सदर वाहन मागणीकारास उपलब्ध करुन देणेकामी तातडीने वरीष्ठांची मान्यता घेणेस अवघड जात असते. परिणामी सदर संघटना, पक्ष कार्यकर्ते यांना हायड्रोलिक वाहन वेळीच उपलब्ध न झाल्यास त्यांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. तसेच उद्यान विभागावर आचार संहितेचा भंग केल्याचा ठपका येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील बाब लक्षात घेता सदरचे हायड्रोलिक वाहन राष्ट्रीय पक्ष , संघटना, संस्था यांना (मागणीकार) यांच्या लेखी स्वरुपात मागणीकाराच्या अपेक्षित कालावधी पर्यंत दिल्यास वाहनाचा इंधन खर्च व कर्मचारी सह वाहनाचे प्रतितास कार्यवाही शुल्क आकारल्यास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या सन २०१८-१९ पान क्र. १ (अ.क्र.१२) दरसुचीनुसार क्रेनचे प्रतितास शुल्क रु. १८३९ /- मात्र असुन, सदर दरान्वये कार्यवाही करणेस तत्कालिन मा. आयुक्त सो यांनी मान्यता दिलेली आहे.

तथापी सद्यस्थितीचे इंधन दर वाढलेले असुन, तत्कालीन सन २०१९-२० च्या दरावर प्रती वर्ष अतिरिक्त १० टक्के वाढीव व १८ टक्के जी.एस.टी. धरुन सन २०२२-२३ चे सदर वाहनाचे मनपाने प्रति तास शुल्क(भाडे) रु.३४०८/- व त्यावर १८ टक्के जी.एस.टी. रु.६१४/- अशी एकुण रु.४०२२/- आकारणी करणे उचित होईल. तसेच हायड्रोलिक वाहन मागणीकाराने खालील अटी-शर्तीची पुर्तता करुन हायड्रोलिक वाहन छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी लेखी अर्ज केल्यास हायड्रोलिक वाहन उपलब्ध करुन देणे सोईचे होईल.

१. मागणीकाराने कार्यक्रम दिनांकाच्या किमान ५ दिवस अगोदर मनपाकडे लेखी अर्ज करावा.

२. मागणीकारांची मागणी दिनांक व वेळ हायड्रोलिक वाहन आपत्ती निवारण कामी व्यस्त असल्यास अथवा वाहनामध्ये तांत्रिक बिघाड झाले असल्यास अशा वेळी मागणीकारास वाहन उपलब्ध होणार नाही. याबाबतची जाणीव मागणीकारास करुन देणे उचित होईल.
३. मागणीकाराने हायड्रोलिक वाहन वापरवेळी वाहन संचलित करणेच्या कार्यवाही अंतर्गत वाहनास अचानक तांत्रिक बिघाड झाल्यास व कोणताही अपघात झाल्यास अथवा पुतळयास पुतळयास इजा किंवा नुकसान झाल्यास त्यास मागणीकार हे जबाबदार राहील असे हमीपत्र अंतर्भुत करणे उचित राहील. मनपास जबाबदार धरण्यात येणार नाही असे हमीपत्र देणे बंधनकारक ठेवणे उचित होईल.
४. हायड्रोलिक वाहनाव्दारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणारी व्यक्ती सदर वेळी नशापान करणार नाही. स्काय लिफट बकेटमध्ये दोन पेक्षा जास्त व्यक्ती बसुन जाणार नाहीत याबाबतची हमीपत्र अर्जासोबत जोडावे तसेच याबाबत सिव्हील डॉक्टराचा देखील वैद्यकीय दाखला देण्यात यावा.
५. मागणीकाराने हायड्रोलिक वाहनाची ज्या कालावधी करिता मागणी केली असेल त्या कालावधीचे प्रति तास शुल्क मनपास आगाऊ भरणे बंधनकारक ठेवणे उचित होईल.

वरील बाबींची पुर्तता संबधीत मागणीकारानी पुर्ण केली नसल्यास त्यांनी केलेली मागणी अमान्य करुन अर्ज निकाली काढणे तसेच वरील अटी अधिकारी व पदाधिकारी यांना वगळून इतर संस्था, संघटना व पक्ष कार्येकर्त यांना लागु करणे कार्यवाहीस उपरोक्त वाहन निश्चित केलेल्या दरानुसार व अटी-शर्तीस अधिन राहुन वाहन मागणीकारांनी हमीपत्र भरुन दिल्यानंतर सदर वाहन संबधीताना उपलब्ध करुन देणेकामीच्या प्रस्तावनेस मा. महासभा अस्तित्वात नसल्याने मा. प्रशासक सो यांच्या अधिकारात प्रशासकीय मंजुरी मिळावी ही विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र.** ५१ **दिनांक** -०९/११ /२०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी मनपाचे हायड्रोलिक वाहन वापराबाबत मागणीकारास हमीपत्रासह मनपाच्या अटी-शर्तीनुसार भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेबात सादर केलेल्या प्रस्तावनेस मा. प्रशासक सो मान्यता मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी मनपाचे हायड्रोलिक वाहन वापराबाबत प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी-शर्ती अधिकारी व पदाधिकारी यांना वगळून इतर संस्था , संघटना व पक्ष कार्यकर्त यांना लागु करणे कार्यवाहीस प्रस्तावनेत निश्चित केलेल्या दरानुसार व अटी-शर्तीस अधिन राहुन मागणीकरांनी हमीपत्र भरुन दिल्यानंतर सदर वाहन संबधीताना उपलब्ध करुन देणेकामी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग २) नवि दि.०६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ(१अ) व १(ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त , भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या

छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळयास पुष्पहार अर्पण करणेकामी मनपाचे हायड्रोलिक वाहन वापरबाबत अधिकारी व पदाधिकारी यांना वगळुन इतर संस्था , संघटना व पक्ष कार्यकर्त यांना लागु करणेच्या कार्यवाही अंतर्गत उपरोक्त प्रति तास शुल्क रु. ४०२२/- आकारणी दर निश्चित करणेस प्रस्तावनेतील अटी-शर्तीस अधिन ठेवुन वाहन भाडेने देण्यास या दरास व धोरणास मान्यता देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

d/b/v/6/ टिपणी-1/ 5